# बहुविद्याशाखीय शिक्षण

बहुविद्याशाखीय शिक्षण ही एक आगळी वेगळीअभ्यासपद्धती आहे. तिच्यामुळे विद्यार्थ्यांना एकाचवेळी वेगवेगळ्या विषयांचे किंवा अभ्यासक्रमांचे ज्ञान मिळविणे किंवा ज्ञानाच्या वेगवेगळ्या दिशा शोधण्याची संधी मिळते. पूर्वीच्या शिक्षणपद्धतीतील कप्पेबंदपणा या पद्धतीत बाजूला ठेवला जातो, त्यामुळे विविध विषयातील साधर्म्यवैधर्म्याकडे पाहण्याची समग्र दृष्टी विद्यार्थ्यांना लाभते, बहुविधविषय शिस्तींचा अभ्यासक्रमात समावेश करण्यामुळे, विद्यार्थ्यांमधील गंभीरपणे विचार करण्याची अणि दैनंदिन जीवनातील विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जाऊन, त्यांचे निराकरण करण्याची त्यांची समज वृद्धिंगत होईल. याप्रकारच्या अभ्यासपद्धतीमुळे त्यातील अध्ययन-अध्यापनामुळे, मूल्यमापनामुळे मानव्यविद्या, सामाजिकशास्त्रे, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, भाषा आणि कला यांच्यासह वेगवगेळ्या विषयांकडे गंभीर, सर्जनशील आणि समीक्षात्मकदृष्टीने पाहण्याची विद्यार्थ्यांचीदृष्टी घडत जाईल. बहुविद्याशाखीय दृष्टिकोणावर विचार करण्यात, ते आत्मसात करण्यात ते सक्षम होत जातील. ते दैनंदिन जीवनात परिणामकारक, सर्जनशील, गंभीर विचारवंत म्हणून घडत जातील. बहुविद्याशाखीय शिक्षणामुळे गंभीर विचार कौशल्ये विकसित केल्यानंतर घडलेले नवस्नातक हे धोरणे, पद्धतींचेविश्लेषण, मूल्यमापनकरूशकतील. तसेचविविधतथ्ये, युक्तिवाद, दावे, वेगवेगळ्यासमजूती, ज्ञानचौकटी याविषयी विश्लेषणात्मक विचार करू शकतील, तशा क्षमता त्यांच्यात निर्माण होतील. याचबरोबर आपल्या

मतांच्या विचारांच्या पुष्ट्यर्थ ते देत असलेल्या विविध पुराव्यांची विश्वासार्हता, त्यांची प्रासंगिकता, विविध स्रोतांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण - त्यांचे संश्लेषण – त्यातून निष्कर्षण, उदाहरणांसह समर्थन अशा विविध कृती करण्यासाठी ते विद्यार्थी सक्षम होत जातील, याजोडीलाच हे नवे पदवीधर त्यांच्यामधील सर्जनशील कौशल्ये विकसित झाल्यावर, एखाद्या वस्तूकडे किंवा विषयाकडे विविध प्रकारच्या दृष्टिकोणातून पाहाण्याची, निर्माण करण्याची, वेगळ्या प्रकारची मर्मदृष्टी त्यांच्यामध्ये निर्माण होईल. यामुळे त्यांच्यामध्ये नाविन्यपूर्णतेने उत्तम कार्य करण्याची क्षमता विकसित होईल. सर्वसामान्य पद्धतीपेक्षा वेगळा (out of the box) विचार करण्याची त्यांना सवय लागेल. त्यांना अपरिचित असलेल्या जटील, क्लिष्ट समस्यांचे निराकरण कसे करावे याचा त्यांना परिचय होईल. बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाच्या चौकटीत मुख्य विषय, उपविषय आणि खुल्या पर्यायांच्या निवडीची लवचिकता ह्या बाबी वैशिष्ट्य पूर्ण ठरतील.

# आतंरविद्याशाखीयशिक्षण

आतंरविद्याशाखीय शिक्षण म्हणजे दोन किंवा अधिक शैक्षणिक विषयांचे एकत्रीकरण! आंतरविद्याशाखीय शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारी समजही विविध अभ्यासशिस्तींमधील आंतरिक नाते उलगडून पाहायला उपकारक ठरते; ती ज्ञानात्मक परिमाणाकडे पाहण्याची सर्वांगीण दृष्टी देते. विद्यार्थ्यांकडे वैचारिक शिस्तीचा अभाव असेल तर त्याला कोणत्याही विषयाचे वरवरचे आणि संदिग्ध ज्ञान प्राप्त होते. आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनामधून अध्यापन करणा-या शिक्षकाने, विद्यार्थ्यांना ते शिकत असलेल्या विषयासंबंधीच्या एकाबाजूचे त्यांना कळणारे ज्ञान आणि अन्य पूरक विषयासंबंधीचेअन्य प्रकारचे ज्ञान यांच्यातील संबंध कसा निर्माण करायचा याचे ज्ञान देणे अपेक्षित आहे. एका बाजूला एखाद्या विशिष्ट वर्गामध्ये शिकविणारे विविध विषयांचे शिक्षक / अध्यापक, त्यांच्या विद्यार्थ्यांना नेमकं काय शिकवत आहेत याची माहिती सर्व शिक्षकांनी स्वत:जवळ मागवून घेतली पाहिजे. दुस-याबाजूला विद्यार्थ्यांनी अध्ययन करण्याचे शिक्षण अवगत करून घ्यायला हवे. थोडक्यात सांगायचं झालं तर राष्ट्रीय श्रेयांकसंरचनाही विशाल पाया असलेल्या आंतरविद्याशाखीय मानव्यविद्या, सामाजिकशास्त्रे, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, भाषा आणि कला यांच्या समग्र शिक्षणाबद्दल विद्यार्थ्यांची समज विकसित करण्यास उपकारक ठरते. यामुळे विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासक्रमांची – व्यावसायिक अभ्यासक्रम आणि कौशल्याधारित अभ्यासक्रमांची कल्पक, लवचिक संयोजने तसेच शिक्षणासाठी एकाधिक आगमने- निर्गमने यांचीआखणी करणे सुलभ होते.

तीन/ चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम

तीन/ चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र शासनाच्या GR क्रमांक NEP-2022 /CR क्रमांक 09/VISHI-3 दिनांक 20 एप्रिल 2023 नुसार विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या श्रेयांकांचे वितरण पुढीलप्रमाणे असेल:

(a) मुख्य (कोअर) विषय

(b) विविध अभ्यासशिस्तीतील उपविषय: 18-20 श्रेयांक,

(c) पहिल्या दोन वर्षांत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या खुले वैकल्पिक अभ्यासक्रमांचे 10-12 श्रेयांक

(d) व्यावसायिक आणि कौशल्य संवर्धन अभ्यासक्रमांचे 14-16 श्रेयांक. या श्रेयांकांचे विभाजन करून पहिल्या तीन वर्षांत व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमांचे 8-10 श्रेयांक आणि पहिल्या दोन वर्षांत कौशल्य वृद्धी अभ्यासक्रमांचे 06 श्रेयांक,

(e) क्षमता वाढीचे अभ्यासक्रम (पहिल्या दोन वर्षांत 8 श्रेयांक), भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) (2 श्रेयांक) आणि मूल्य शिक्षण अभ्यासक्रम (1 वर्षात 04 श्रेयांक) असे एकूण 14 श्रेयांक,

)f) विद्यार्थ्यांनी निवडलेल्या मुख्य विषयाशी निगडित असे क्षेत्र प्रकल्प (Field Projects), समूह सहभाग (Community Engagement) आणि सेवा (Service), प्रशिक्षुता (Internship) शिक्षुता / (Apprenticeship); (ऑनर्स पदवीसाठी तिसऱ्या आणि चौथ्या वर्षात 8 क समाविष्टश्रेयांकेले जातील(, सह 8 पहिल्या दोन वर्षांत) अभ्यासक्रम-श्रेयांक) आणि संशोधन प्रकल्प वर्षांच्या ऑनर्ससाठी 4 संशोधन पदवीसह ) .(श्रेयांक 12 अंतिम वर्षात

## मुख्य विषयांची, उपविषयांची आणि अन्य विषयांची निवड

1. मुख्य विषय : पदवीसाठी मुख्य विषयाची (Core Subject) निवड ही केंद्रस्थानी असावी आणि त्या विषयाचे एकूण श्रेयांकांपैकी किमान50 टक्के श्रेयांक असावेत. यामध्ये अनिवार्य मुख्य अभ्यासक्रम- प्रात्यक्षिक आणि मीमांसा, मुख्य पर्यायी विषय, अनिवार्य प्रशिक्षुता, प्रत्यक्ष प्रकल्प, उमेदवारी (अप्रेंटिसशिप)/ मुख्य विषयासंबंधी समुदाय प्रतिबद्धता प्रकल्प (Community Engagement Projects), चर्चासत्रे यांचा समावेश होतो, जर विद्यार्थ्याला ऑनर्ससहित संशोधन पदवी हवी असेल तर त्याला तत्संबंधी विषयातील संशोधन प्रकल्पाचाही (12 श्रेयांक) त्यात समावेश करावा लागेल.

### मुख्य विषय: विविध प्रकार

१) विभाग/शाखा विशिष्ट मुख्य विषय Department/Discipline Specific Core (DSC) किंवा एकल प्रमुख विषय (single major).

२) स्कूल विशिष्ट मुख्य विषय SSC(School Specific Core) किंवा बहुविद्याशाखीय मुख्य विषय

३) विद्याशाखीय विशिष्ट विषय FSC (Faculty Specific Core) किंवा दुहेरी मुख्य विषय

४) आंतरविद्याशाखीय मुख्य विषय.

मुख्य विषयांतर्गत असलेल्या विविध उपविषयांना समजून घेण्यासाठी, तसेच नव्याने उदयास येणाऱ्या क्षेत्रांना अभ्यासक्रमात सामील करून घेण्यासाठी वैकल्पिक (electives) उपविषयांचा समूह (Baskets) दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या वर्षी उपलब्ध करून दिला जाईल. याचबरोबर विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी, मुख्य अभ्यासक्रमांशी संबंधित आवश्यक व्यावसायिक कौशल्ये समाविष्ट करणारे व्यावसायिक अभ्यासक्रम हे पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात दिले जातील. मुख्य विषयाशी निगडित असे व्यावसायिक अभ्यासक्रम प्रत्यक्ष अनुभवाची/ प्रशिक्षणाची (Hands-on Training)पूर्तता करतील आणि आत्मसात केलेल्या तंत्राची प्रात्यक्षिके सादर करण्याचा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतील. याव्यतिरिक्त, सर्व चार वर्षांच्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपचे किमान 4 श्रेयांक मिळवावे लागतील. त्यासाठी त्यांना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात, एखाद्या उद्योग समूहात, कंपनीत किंवा संशोधन संस्थांमध्ये उन्हाळी सुट्टीत 4 आठवड्यांचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. आता उच्च शिक्षणाला उद्योगजगताशी जोडण्यात अप्रेंटिसशिप/इंटर्नशिपची प्रमुख भूमिका असणार आहे.

अध्ययनाच्या पहिल्या वर्षात आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम समजून घेण्यासाठी वा आपली विषयातील आवड शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देऊन, दुस-या सत्राच्या अखेरीस मुख्य विषय बदलण्याची परवानगी दिली जाऊ शकते.उच्च शिक्षण संस्थांनी अशा प्रकारे विषय बदलण्याची परवानगी मागणा-या विद्यार्थ्यांसाठी अथवापुन:प्रवेशासाठी किंवा पार्श्व प्रवेशासाठी काही रचना करणे अपेक्षित आहे.

2. व्यावसायिक अभ्यासक्रम आणि कौशल्य आधारित शिक्षण (VSC) : हे मुख्य विषयाशी जोडलेले असावेत. उदाहरणार्थ शिरीषला वाणिज्य शाखेमध्ये म्हणजेच कॉमर्समध्ये रस आहे आणि त्याचबरोबर त्याला सप्लाय चेन मॅनेजमेंट, ब्लॉक चेन मॅनेजमेंट आणि लॉजिस्टिक्स यामध्ये देखील रुची आहे. या शैक्षणिक धोरणाअंतर्गत हे सर्व व्यावसायिक प्रशिक्षण घेऊ शकतो व त्यात प्राविण्य मिळवू शकतो. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांनी विद्यार्थ्यांच्या मुख्य विषयानुसार व्यावसायिक अभ्यासक्रम आणि कौशल्य आधारित शिक्षण अभ्यासक्रम बनवायला पाहिजेत.

3. उपविषयांची निवड : मुख्य किंवा कोअर विषयाबरोबरच विद्यार्थ्याला बहु किंवा आंतर-विद्याशाखीय विषयांतील सखोल ज्ञान ,हेसैद्धांतिक आणि प्रत्यक्ष अनुभवावर मिळवणे आवश्यक असते. हे ज्ञान उपविषयांची निवड केल्यावर मिळते.बहुविद्याशाखीय शिक्षण नवे आयाम प्राप्त करून देण्यासाठी उपविषयांची निवड हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता संरचनेनुसार (NHEQF- National Higher Education Qualification Framework) विद्यार्थी जे उपविषय निवडतील त्यांचे 18-20श्रेयांक त्यांना मिळवावे लागतील. निवडलेले उपविषय हे मुख्य विषयाची शाखासोडूनइतरशाखामधून निवडलेले असावेत. उदाहरणार्थएखादा विदयार्थी चार वर्षाच्या कॉम्प्युटर इंजीनियरिंग पदवीअभ्यासक्रम करताना उपविषय म्हणून शास्त्रीय संगीताची निवड करेल.विद्यापीठाने किंवा उच्च शिक्षण देणा-या संस्थांनी अशा उपविषयांची एक यादी घोषित करतील व ती विद्यार्थ्यांना

निवडीसाठी उपलब्ध करून देतील. सामान्यत: प्रत्येकी दोन-तीन-चार श्रेयांक असलेल्या सहा उपविषयांचा एक गुच्छ तयार करता येईल अशी एक यादी उपलब्ध झाली पाहिजे. NEP मध्ये सुचवल्याप्रमाणे उपविषयांच्या आखणीचा भर हा बहुविद्याशाखीय शिक्षणावर असेल, याची काळजी घेतली गेली पाहिजे. उपविषयांची निवड करताना विद्यार्थ्यांना मुख्य विषयाला पूरक असे बहुविद्याशाखीय उपविषय कसे निवडता येतील याकरिता पण सल्ला दिला गेला पाहिजे.

4. अभ्यासक्रमाच्या अन्य विषयांची निवड : यासाठी विद्यार्थ्यांना पहिल्या दोन वर्षांत किंवा चार सत्रांत सर्वसामान्य/ खुले पर्यायी अभ्यासक्रम किंवा बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमांचे बारा श्रेयांक मिळवावे लागतील, कौशल्य विकासाधारित अभ्यासक्रमांचे (Ability Enhancement Courses) आठ श्रेयांक मिळवावे लागतील- यात आधुनिक भारतीय भाषांचा किंवा इंग्रजी भाषेचा; भाषाधारित किंवा संभाषणाधारित कौशल्यांचा विकास घडवणारे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना निवडावे लागतील. बहुभाषिकताहेNEP 2020 चे आणखी एक लक्ष्य आहे.NEP 2020 च्या कलम २२.४ नुसार भाषा या कला आणि संस्कृतीची अतूटपणे जोडल्या गेल्या आहेत. यातूनहा क्षमता वृद्धिंगत अभ्यासक्रम )Ability EnhancementCourses -AEC) एक भारतीय भाषा आणि इंग्रजी भाषा यांचे पहिल्या दोन वर्षांत आठ श्रेयांक विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देतो. या अभ्यासक्रमांची रचना विद्यार्थ्यांनी निवडलेल्या भारतीय भाषेमागील आणि इंग्रजी भाषेमागील सांस्कृतिक आणि बौद्धिक वारशाची समज वृद्धिंगत व्हावी याप्रमाणे ते

आखले गेले आहेत. यामधून विद्यार्थ्यांना भारतीय आणि इंग्रजी भाषेमागील जटिलता समजून घेणे शक्य आहे. या अभ्यासक्रमाचा हेतू विद्यार्थ्यांना गंभीर वाचनाची सवय लावणे ,संकल्पनात्मक, समीक्षात्मक , शैक्षणिकलेखनकौशल्यांसह  मुख्य भाषिक कौशल्ये आत्मसात करणे आणि त्यांचा उपयोग करण्यात सक्षम करणे ,आपला युक्तिवाद सुस्पष्ट-सुसंगतपणे मांडण्यास यामुळे मदत होईल. निव्वळ अभ्यासापेक्षा ज्ञानप्राप्तीचे अत्यंत महत्त्वाचे माध्यम म्हणून भाषेचे महत्त्व आहेव हे महत्त्व हे अभ्यासक्रम पटवून देतात. या जोडीने विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षातील दोन सत्रांत मूल्य शिक्षण, पर्यावरण अभ्यास, व्यावसायिक नीतिमत्ता, जीवनकौशल्याधारित अभ्यासक्रमांचे ४ श्रेयांक प्राप्त करून घ्यावे लागतील.मूल्यशिक्षण हा अभ्यासक्रमाच्या चौकटीतील एक महत्त्वाचा भाग आहेत्याच्या समावेशामुळे सत्य ., नीतिमान आचरण, शांतता, प्रेम, अहिंसा, वैज्ञानिक स्वभाव, नागरिकत्व मूल्ये आणि जीवनतावादीकौशल्य यांच्या मानव-, नैतिक, घटनात्मक आणि वैश्विक मानवी मूल्यांचा (Universal Human Values- UHV) विकास होणे अपेक्षित आहेसामुदायिक सेवा  चे विविध पाठ आणिवेसे जमास . कार्यक्रमांमध्ये सहभाग हा देखील सर्वांगीण शिक्षणाचा अविभाज्य भाग म्हणून समाविष्ट असेलण आणि शाश्वत जागतिक नागरिकत्व शिक्ष . विकासासाठी शिक्षण हे देखील अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनू शकतील. अशा विषयांच्या समावेशामुळे उद्याचे विद्यार्थी हे जागतिक आणि शाश्वत विकास समस्यांबद्दल जागरूक होण्यासाठी, त्या समजून घेण्यासाठी; तसेच अधिक शांततापूर्ण, सहिष्णू, समावेशक, सुरक्षित आणि शाश्वत समाजांचे सक्रिय प्रवर्तक होण्यासाठी सक्षम बनतील.

यात जोड अभ्यास म्हणून मुख्य विषयांच्या साथीने भारतीय ज्ञान प्रणालीवरील विविध मोड्यूल्स, क्रीडा; ललित/ उपयोजित/ दृश्य कला आणि सांस्कृतिक उपक्रमांवर आधारलेले अभ्यासक्रम यांचाही समावेश असेल.निरामय आरोग्याशी संबंधित अभ्यासक्रमाचे घटक एखाद्या व्यक्तीच्या शारीरिक, भावनिक, बौद्धिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणीय कल्याणाच्या इष्टतम स्थितीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करतीलक्रीडा आणि तंदुरुस्ती क्रियाकलाप . (Physical Fitness Courses) व योगशिक्षणहे विद्यार्थ्यांना दिले जाऊ शकतात . योगशिक्षणाने विद्यार्थ्यांना त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक क्षमतांमध्ये एकात्मता निर्माण होईल. या धोरणाचे उद्दिष्ट्य विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या तयार करणे आणि त्यांना एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल मूलभूत ज्ञानाने सुसज्ज करणे, स्वयंशिस्त आणि - नियंत्रण राखणे-आत्म, स्वतःला चांगल्या प्रकारे हाताळण्यास शिकणे हेही आहे. क्रीडा आणि तंदुरुस्ती क्रियाकलापांचे अभ्यासक्रमांनी शारीरिक तंदुरुस्तीच्या सुधारणेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. या उपक्रमांचे विविध उद्देश शरीराचे विविध घटक आणि शारीर सामर्थ्य, वेग, समन्वय, सहनशक्ती आणि लवचिकता यांसारख्या तंदुरुस्तीशी संबंधित कौशल्ये सुधारणे; क्रीडा कौशल्यांचे संपादन तसेच विशिष्ट खेळाशी संबंधित मूलभूत हालचाली कौशल्ये; रणनीतिक क्षमता सुधारणे; आणि मानसिक क्षमता सुधारणे असे असतील. राष्ट्रीय सेवा योजना )NSS), नॅशनल कॅडेट कॉर्प्स )NCC) आणि प्रौढ शिक्षण साक्षरता/उपक्रमांशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभाग हे घटकही आता अभ्यासक्रमाच्या चौकटीचा भाग बनतीलयूजीसीच्या मार्गदर्शक .

तत्त्वांनुसार, 'लोकसहभाग आणि लोकसेवा (Community Engagement and Service) अथवा किंवा प्रादेशिक घटना चिकित्सा (Regional Case Studies) किंवा सामाजिक उद्योजकता अभ्यासक्रम (Social Entrepreneurship Courses) हे विद्यार्थ्यांना समाजातील सामाजिकआर्थिक समस्यांशी - परिचित करण्याचा प्रयत्न करतात. या प्रकारच्या अभ्यासामुळे, विद्यार्थ्यांना तात्त्विक अभ्यासाबरोबरच प्रत्यक्ष जीवनातील अनुभवांशीही समरस होता येतंयासाठ .ी दोन श्रेयांकांचा वैकल्पिक अभ्यासक्रम किंवा तीस तासांचा एखादा अॅड-ऑन कोर्स विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येऊ शकतो. अशा अभ्यासक्रमांचा किमान पन्नास टक्के भाग हा प्रत्यक्ष कार्याचा (Field Work) असणे गरजेचे असेल.